## परिपत्रक क्रमांक 342, दिनांक 18/7/2008

**विषय:- कार्यालयात वेळेवर हजर राहण्याबाबत.**

असे निदर्शनास आले आहे की, काही कर्मचारी कार्यालयात वेळेवर हजर राहत नाहीत. विधान सभेचे पावसाळी अधिवेशन दिनांक 16/7/2008 पासून सुरु झाले असून, त्याबाबत कार्यालयाव्दारे यापूर्वीच सर्व कार्यालयीन कर्मचायांना अवगत करण्यात आलेले आहे, असे असताना सुध्दा अनेक कर्मचारी कार्यालयीन वेळेत कार्यालयात हजर राहत नाहीत. ही बाब गंभीर स्वरुपाची असून, कार्यालयीन प्रशासन व शिस्तीच्या विरुध्द आहे.

अधिवेशन कालावधीत फॅक्सव्दारे/स्पीड पोस्टव्दारे प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांना तात्काळ उत्तर दयावयाचे असते व तारांकित प्रश्नांची माहिती शासनास तात्काळ सादर करावयाची असते. म्हणून सर्व संबंधीत कर्मचायांनी कार्यालयीन वेळेत हजर राहून स्वत:च्या टेबलचे कामकाज काळजीपूर्वक पाहणे अत्यंत महत्वाचे व जरुरीचे आहे.

तरी सर्व कार्यालयीन कर्मचायांना याव्दारे सुचित करण्यात येते की, यापूर्वीचे माननीय धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे याबाबत निर्गमित केलेले परिपत्रक क्रमांक 249 नुसार कार्यालयीन शिस्तीचे पालन करावे आणि सर्व कर्मचायांनी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित रहावे.

सर्व कर्मचायांनी याची नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
धर्मादाय सह आयुक्त,
मुंबई/बृहन्मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/
नाशिक/अमरावती/कोल्हापूर/लातूर.

सहायक धर्मादाय आयुक्त,
ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/अहमदनगर/सोलापूर/जळगांव/
धुळे/सांगली/सातारा/परभणी/नांदेड/उस्मानाबाद/बीड/जालना/
अकोला/यवतमाळ/बुलढाणा/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/भंडारा.